**MHJN050004322026**

दाखल दिनांक :– ०४.०४.२०२६
नोंदणी दिनांक :– ०७.०४.२०२६
निकाल दिनांक :– ०३.०७.२०२६
कालावधी :– ०० व. ०२ म. २९ दि.

**सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), परतूर यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी अपर्णा बा. राऊत )**

**दिवाणी कि. अर्ज. क्र. ५८/२०२६** **निशाणी क्र. १८**

१. **नाहीद बेगम देशमुख,**
वय – ५१ वर्षे, व्यवसाय – घरकाम,
रा. दिक्षीत गल्ली, परतूर, ता.परतूर, जि.जालना.

२. **देशमुख नसीम अखतर मोहम्मद रफिकुद्दीन**
वय – ५४ वर्षे, व्यवसाय – घरकाम
रा.मालापुरी, ता.जि.बीड

**....अर्जदार.**

**विरुध्द**

**निरंक** **....गैरअर्जदार.**

---

अर्जदारांकरीता विद्वान विधीज्ञ :– **श्री. आर.एल.लिंबूळकर**

---

## न्यायनिवाडा

( पारीत दिनांक ०३.०७.२०२६ )

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

०२. थोडक्यात अर्जदारांचे असे म्हणणे आहे की, **मयत अमिनोद्दीन उर्फ चांदपाशा गुलाम रसूल देशमुख व मयत दौलत बी अमिनोद्दीन देशमुख** हे अर्जदार क्र. ०१ व ०२ यांचे वडील व आई होते. मयत अमिनोद्दीन उर्फ चांदपाशा गुलाम रसूल देशमुख यांचे दिनांक

**१७.०४.२०१४** रोजी व मयत दौलतबी अमिनोद्दीन देशमुख यांचे दिनांक **१८.०३.२०२१** रोजी मौजे परतुर, ता. परतुर, जि. जालना, येथे निधन झाले होते. तसेच मयत अमिनोद्दीन उर्फ चांदपाशा गुलाम रसूल देशमुख यांची आई मयत खैरुनिसा गुलाम रसुल देशमुख यांचे सन १९८९ रोजी निधन झालेले आहे. अशा प्रकारे अर्जदार हे मयत अमिनोद्दीन उर्फ चांदपाशा गुलाम रसूल देशमुख व मयत दौलत बी अमिनोद्दीन देशमुख यांचे कायदेशीर वारस आहेत. याशिवाय मयत अमिनोद्दीन उर्फ चांदपाशा गुलाम रसूल देशमुख व मयत दौलत बी अमिनोद्दीन देशमुख यांना जवळचे अन्य कोणीही वारस नाहीत.

**०३.** अर्जदारांचे यापुढे असेही कथन आहे की, मयत अमिनोद्दीन उर्फ चांदपाशा गुलाम रसूल देशमुख व मयत दौलत बी अमिनोद्दीन देशमुख यांना अर्जदारांशिवाय कोणीही वारस नाहीत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता प्रस्तुतचा अर्ज सादर करण्यात आला आहे.

**०४.** अर्जात केलेल्या कथनावरुन पुढील मुद्दे माझ्या विचारार्थ येतात व त्यावर मी खालील दिलेल्या कारणांसाठी माझा निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | मागणी केल्याप्रमाणे वारसाहक्क प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदार पात्र आहेत काय ? | होय. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशानुसार |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र- १ व २ बाबत

**०५.** अर्ज व त्यातील म्हणणे शाबीत करण्यासाठी अर्जदारांपैकी नाहीद (साक्षीदार क्र.०१) (निशाणी क्र.११) यांनी त्यांच्या पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. अर्जदाराने कागदोपत्री पुराव्यामध्ये मयत अमिनोद्दीन उर्फ चांदपाशा गुलाम रसूल देशमुख व मयत दौलत बी अमिनोद्दीन देशमुख यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची पडताळणी प्रत (निशाणी १५ व १६), अर्जदारांच्या आधारकार्डाच्या पडताळणी प्रती (निशाणी १३ व १४), इत्यादी कागदपत्रे दाखल केलेले आहे. तसेच अर्जदार नाहीद बेगम यांनी निशाणी क्रमांक १२ वर शपथपत्् दाखल करुन शपथेवर सांगितले की, त्यांची आजी व मयत अमिनोद्दीन उर्फ

चांदपाशा गुलाम रसूल देशमुख यांची आई मयत खैरुनिसा गुलाम रसुल देशमुख यांचा मृत्यु सन १९८९ मध्ये झाला आहे.

**०६.** सदरील अर्जाबाबत 'दै. आनंदनगरी' वर्तमानपत्र (निशाणी क्र. १०) मध्ये जाहीर नोटिस दिनांक १२.०५.२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. तसेच न्यायालयीन बेलिफामार्फत केलेला जाहीरनामा **निशाणी क्र. ०७** व त्याचा अहवाल दाखल केलेला आहे. तरीसुद्धा कोणत्याही व्यक्तीने सदरच्या अर्जास हरकत मांडली नाही.

**०७.** न्यायालयाने 'दै. आनंदनगरी' वर्तमानपत्राचे अवलोकन केले. वर्तमानपत्रात जाहीर नोटिस देऊनसुद्धा प्रकरणात कोणीही हजर झाले नाहीत. एवढेच नव्हे तर न्यायालयाने न्यायालयीन बेलिफामार्फत वारसाच्या प्रमाणपत्राबद्दल जाहिर प्रसिद्धिकरण केले. संबंधित बेलिफानेसुद्धा जाहीरनामा केल्याबाबत दि. २२.०४.२०२६ रोजीचा अहवाल सादर केला. न्यायालयाने त्याचे अवलोकन केले. सदर प्रकरणामध्ये आजतागायत कोणीही आक्षेप अथवा हरकत नोंदविलेली नाही. त्यामुळे अर्जातील अबाधीत कथनांवर व अर्जदारांनी सादर केलेल्या पुराव्यावर विश्वास ठेवण्याशिवाय पर्याय नाही.

**०८.** कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसते की, अर्जदार हे मयत अमिनोद्दीन उर्फ चांदपाशा गुलाम रसूल देशमुख व मयत दौलत बी अमिनोद्दीन देशमुख यांचे कायदेशीर वारस आहेत. या संदर्भात मी **मा. मुंबई उच्च न्यायालयाचा न्यायनिवाडा गणपती विनायक अचवल २०१४ (६) एम.एच.एल.जे ६८६** याचा अवलंब करत आहे. त्यात मा. न्यायमुर्तींनी परिच्छेद क्रमांक ५ मध्ये असे निरीक्षण केलेले आहे की,

> "The position of law that emerges from the above provisions is that, an heirship certificate does not bestow the status of an heir upon a person. Grant of such a certificate is only a formal recognition of his existing status as an heir. An heir or executor or legal administrator, by his such status, can assume management of the property of the deceased even without a formal recognition by the Court. A person may obtain heirship certificate in any of the three situations i.e. (i) if he so desires (ii) where his right as an heir is disputed, and (iii) in order to give confidence to the persons in possession of or indebted to the estate and to deal with them. Thus grant of heirship certificate is solely, for the convenience of the heir. Beyond that, it is of no significance. The rules also indicate that, it is mandatory for the Court to issue an heirship certificate, if after publication of citation, no objector comes forward within one month from the date of publication. In that case, the Court shall forthwith receive such proof as may be offered of the right of

the person making the claim, and if satisfied, shall grant a certificate in the prescribed form declaring him the recognized heir of the deceased.”

०९. मा. न्यायमुर्तींच्या वरील निष्कर्षानुसार आणि अभिलेखावर दाखल असलेल्या विनाआव्हानीत पुरावा लक्षात घेतल्यानंतर या अर्जाच्या हकिकतीबाबत माझे असे मत आहे की, अर्जदार क्र. १ व २ हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. अर्जदारांचा अर्ज व त्यातील कथने विनाआव्हानीत राहिलेली आहे. तसेच त्यांनी दिलेला पुरावा देखील विनाआव्हानीत राहिला आहे. अर्जदार हे मयत अमिनोद्दीन उर्फ चांदपाशा गुलाम रसूल देशमुख व मयत दौलत बी अमिनोद्दीन देशमुख यांचे वारस असल्याचे दिसत आहे. सर्व बाबी विचारात घेता अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. तथापी या संदर्भात, मी हे नमुद करु इच्छिते की, वारस प्रमाणपत्राची मागणी करणा–या व्यक्तीला वारस म्हणून मान्यता मिळण्याशिवाय, अशा वारस प्रमाण पत्राखाली मृत व्यक्तीच्या मालमत्तेवर कोणताही अधिकार किंवा शीर्षक मिळत नाही. म्हणुन मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी व मुद्दा क्र.२ चे उत्तर त्याप्रमाणे देऊन खालील आदेश पारीत करीत आहेः–

:: **आ दे श** ::

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. नाहीद बेगम देशमुख (अर्जदार क्र.१) व देशमुख नसीम अखतर मोहम्मद रफिकुद्दीन (अर्जदार क्र.२) हे मयत अमिनोद्दीन उर्फ चांदपाशा गुलाम रसूल देशमुख व मयत दौलत बी अमिनोद्दीन देशमुख यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत त्यांना बॉम्बे रेग्युलेशन चॅप्टर ८, १८२७ अन्वये आवश्यक कोर्ट फी आकारुन वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) निर्गमीत करण्यात यावे.

APARNA BALASAHEB RAUT

Digitally signed by APARNA BALASAHEB RAUT
Date: 2026.07.03 13:06:18 +0530

दिनांक :– ०३.०७.२०२६

ठिकाण :– परतूर

(**अपर्णा बा. राऊत**)

सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

परतूर

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Jr. Clerk | :- | S.A. Harale |
| Name of Judge | :- | Jt. C.J.(J.D.), Partur |
| Date of decision | :- | 03.07.2026 |
| Order signed by P.O. on | :- | 03.07.2026 |
| Order uploaded on | :- | 03.07.2026 |

Sd/-
(S.A. Harale)
Jr. Clerk